नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३५१ Issue - 351 | वार शनिवार दि. १० मे २०२५ Blow- Saturday Date 10 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



## पाकिस्तानचा नागरी विमानांचा ढाल म्हणून उपयोग

### पाकच्या चेहऱ्याची मोठी चिरफाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तान किती खालच्या पातळीवर जाऊ शकतं याचा नवा पुरावा आता समोर आला आहे. पाकिस्तानने गुरुवारी रात्री साडे सात ते आठ वाजेच्या दरम्यान अचानक भारताच्या सीमाभागातील राज्यांमध्ये ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण भारतीय लष्कराने सर्व हल्ले परतवून लावले. या घटनेनंतर आज परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद पार पडली.

**पाकिस्तानचा निष्ठूरपणा, स्वत:च्या नागरिकांचा जीव धोक्यात टाकला**

यावेळी पाकिस्तान किती क्रूर आहे याचा मोठा खुलासा झाला आहे. पाकिस्तान स्वत:च्या देशाच्या नागरिकांचा देखील विचार करत नाही, असंच यातून समोर आलं. पाकिस्तानने एवढा मोठा ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भारतीय वायुसेना प्रत्युत्तर देणार याची माहिती असताना देखील पाकिस्तानने त्यांची हवाई हद्द बंद केली नाही. यामुळे पाकिस्तान किती खालच्या स्तरावरची खेळी खेळतो हे यातून स्पष्ट होतं.

परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरैशी यांनी पुरावा दाखवत पाकिस्तानच्या कुरापतीची माहिती दिली. पाकिस्तानने जम्मू-काश्मीर, गुजरात, राजस्थान, पंजाबच्या विविध भागात तब्बल ३६ ठिकाणी ४०० ड्रोन्सचा मारा केला. भारताने त्याच्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं. यानंतर भारताने देखील चार ड्रोन पाठवत पाकिस्तानची रडार सिस्टीम उद्धवस्त केली. पण पाकिस्तानने त्याहीपेक्षा मोठी क्रूरपणा केला.

भारतावर हल्ला केल्यानंतर भारतीय वायुसेना प्रतिहल्ला करणार याची पाकिस्तानला जाणीव होती. त्यामुळे पाकिस्तानने त्यांचं हवाई क्षेत्र बंद करणं अपेक्षित होतं. पण पाकिस्तानने तसं केलं नाही. याउलट पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक सुरु ठेवली. असं असताना भारताने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला असता तर या आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीवर परिणाम पडला असता किंवा प्रवाशांचा जीव धोक्यात आला असता. त्यामुळे भारताने संयमाने परिस्थिती हाताळली. भारताने मानवतेचा विचार करुन वायुसेनेकडून कठोर पाऊल उचललं नाही. पण यातून पाकिस्तान किती खोटारडा आहे. पाकिस्तानला आपल्याच नागरिकांच्या जीवाची पर्वा नाही हे स्पष्ट होतं. कर्नल सोफिया कुरैशी यांनी याबाबतचे सर्व पुरावे पत्रकार परिषदेत सादर केले.

कर्नल सोफिया कुरैशी नेमकं काय म्हणाल्या?

पाकिस्तानचा बेजबाबदारपणा पुन्हा समोर आला. पाकिस्तानने रात्री साडेआठ वाजता ड्रोन आणि मिसाईल हल्ला केल्यानंतर आपलं हवाई क्षेत्र बंद केलं नाही. पाकिस्तान आपल्या नागरी विमानांना ढाल बनून उपयोग केला. भारतात हल्ला केल्ल्यानंतर भारताकडून तीव्र प्रतिक्रिया दिली जाऊ शकते हे माहिती असताना पाकिस्तानने हवाई क्षेत्र बंद केलं नाही. पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय सीमेजवळ नागरी विमानांनी वाहतू सुरुच ठेवली. भारतीय वायुसेने आपली प्रतिक्रिया देताना संयम दाखवला आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीचं संरक्षण केलं, असं कर्नल सोफिया कुरैशी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

## पंतप्रधान मोदींची तिन्ही दलांच्या प्रमुखांसोबत बैठक

# १५ मेपर्यंत २८ विमानतळ बंद राहणार



### संवेदनशील विमानतळ, परिसरांची सुरक्षा वाढवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज सशस्त्र दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. सीमावर्ती भागातील परिस्थिति आणि शस्त्रसज्जतेचा आढावा यावर उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला असताना ही बैठक झालेली आहे. काल रात्री पाकिस्तानने भारतीय हद्दीतील सीमावर्ती भागात हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला. रहिवासी परिसरासह सैनिकी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला करण्याचे प्रयत्न पाकिस्तानकडून करण्यात आले. भारतीय सैन्यानं सारे प्रयत्न हाणून पाडले. त्यामुळे पाकिस्तान बॅकफूटवर गेला आहे. या सगळ्या घडामोडी सुरु असताना पंतप्रधान मोदींनी सैन्याच्या तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली. सध्याची तणावपूर्ण परिस्थिती पाहता भारतानं जम्मू, श्रीनगर, लेह, अमृतसर, चंदिगढ, जोधपूरसह २८ विमानतळ बंद केले आहेत. २८ विमानतळ १५ मेच्या सकाळी ५ वाजून २९ मिनिटांपर्यंत बंद असणार आहेत. त्यामुळे एअर इंडिया, इंडिगो, स्पाईसजेटनं या शहरांमधून होणारी उड्डाणं रद्द केली आहेत. पाकिस्तानी हल्ल्यांपासून नागरिकांचं संरक्षण करण्यासाठी आणि लष्करी तयारी अधिक मजबूत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सीमा सुरक्षा दल आणि अन्य केंद्रीय दलांना हाय अलर्टवर ठेवण्यात आलेलं आहे. देशातील संवेदनशील विमानतळांची आणि त्यांच्या परिसरांची सुरक्षा वाढवण्यात आलेली आहे. पंजाबमधील अमृतसर, लुधियाना, पटियाला, भटिंजा, हलवाडा, पठाणकोट, हिमाचल प्रदेशातील भुंतर, शिमला, कांगडा-गग्गल, जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील श्रीनगर, जम्मू, लेह, राजस्थानमधील किशनगढ, जसलमेर, जोधपूर, बिकानेर, गुजरातमधील मुंद्रा, जाम नगर, हिरासर, पोरबंदर, केशोद, कांडला, भुज, केंद्रशासित प्रदेशातील चंदिगढ विमानतळ बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीला तिन्ही दलांच्या प्रमुखांसह सीडीएस हजर होते. या बैठकीत ऑपरेशन सिंदूरची प्रगती, सीमेवरील तणाव, भविष्यातील रणनीतीवर चर्चा झाली. सैन्याची तयारी, तातडीनं करण्याची कारवाई हे विषय बैठकीच्या केंद्रस्थानी होते. पाकिस्तानला सगळ्या आघाड्यांवर घेरण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर पाकिस्तानची कोंडी करण्याचे प्रयत्न भारताकडून सुरु आहेत. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

## पाकिस्तानचा पुन्हा सीमाभागात गोळीबार; जम्मू, सांबा, पठाणकोट सेक्टरमध्ये पुन्हा ड्रोनची घुसखोरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत-पाकिस्तान तणाव पुन्हा वाढताना दिसतोय. पाकिस्तानच्या कुरापती काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. पाकिस्ताने काल रात्री ड्रोन हल्ले केल्यानंतर आज पुन्हा एकदा कुरापत सुरु केली आहे. पाकिस्तानकडून पुंछ सेक्टरमध्ये पुन्हा गोळीबार सुरु करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या लष्कराकडून बेछुट गोळीबार सुरु झालाय. भारतीय लष्कराकडून पाकिस्तानच्या लष्कराला चोख प्रत्युत्तर दिलं जात आहे. पाकिस्तानकडून उरी सेक्टरमध्येदेखील नियंत्रण रेषेवर गोळीबार सुरु केला आहे. पाकिस्तानच्या गोळीबाराला भारताकडून प्रत्युत्तर दिलं जात आहे. याशिवाय जम्मू, सांबा, पठाणकोट येथे देखील पाकिस्तानचे ड्रोन दिसल्याची माहिती समोर येत आहे. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

जम्मूमध्ये भारतीय वायुसेने पाकिस्तानी ड्रोन पाडले तेव्हा लाल रेषा दिसल्या आणि स्फोटांचे आवाज ऐकू आले. एएनआय वृतसंस्थेने या घटनेचे व्हिडडीओ ट्विट केले आहेत. दरम्यान, फिरोजपूर येथे देखील पाकिस्तानी ड्रोन हवेत घिरट्या मारताना दिसत आहेत. हे ड्रोन भारतीय सैन्याकडून पाडले जात आहेत. या दरम्यान, सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर फिरोजपूरमध्ये वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. सांबा येथे स्फोट झाल्याचे ऐकू आल्यानंतर उधमपूरमध्ये पूर्णपणे वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. दरम्यान, जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी जम्मूच्या आसपासच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना रस्त्यावर न जाण्याचे आवाहन केले आहे. मी जिथे आहे तिथून आता अधूनमधून स्फोटांचे आवाज येत आहेत. कदाचित जोरदार तोफ गोळ्यांचे ते आवाज ऐकू येत आहेत, असे त्यांनी सांगितले.

जम्मू आणि आसपासच्या सर्वांना माझे कळकळीचे आवाहन आहे की, कृपया पुढील काही तास रस्त्यावरून बाहेर पडू नका, घरीच राहा. अफवांकडे दुर्लक्ष करा, अफवा पसरवू नका आणि आपण एकत्र मिळून यातून मार्ग काढू, असं जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले आहेत.

महत्त्वाच्या घडामोडी

जम्मू, सांबा, पठाणकोट सेक्टरमध्ये पाकिस्तानी ड्रोन दिसले, असे संरक्षण सूत्रांच्या हवाल्याने एएनआयने म्हटले आहे.

जम्मूमध्ये पूर्णपणे ब्लॅकआउट करण्यात आले आहे आणि सायरन ऐकू येत आहेत.

ब्लॅकआउट दरम्यान भारताच्या हवाई संरक्षण दलाने पाकिस्तानी ड्रोन रोखले तेव्हा सांबा येथे स्फोटांचे आवाज ऐकू आले.

पाकिस्तानने बारमेर, जैसलमेर आणि पोखरन येथे ड्रोन हल्ला केल्याची माहिती डीडी न्यूजने दिली आहे.

## पाकिस्तान विरुद्ध लढताना घाटकोपर मधील जवान मुरली नाईक शहीद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर (केतन भोज) : भारताने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून दहशतवादी तळांवर हल्ले केल्यानंतर बोकाळलेल्या पाकिस्तानने सीमारेषेवर गोळीबार सुरू केला आहे.भारतीय सैन्य दलानेही या गोळीबाराला चोख प्रत्त्युत्तर दिले असून पाकिस्तानी रेंजर्सना तडाखा दिला आहे.सीमरेषेवर तणाव पाहायला मिळत असून चकमक अद्यापही सुरुच आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर बिथरलेल्या पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमध्ये केलेल्या भ्याड हल्ल्यात मुरली नाईक या भारतमातेच्या जवानाला वीरमरण आले आहे.घाटकोपर कामराज नगर येथील जुने कार्यकर्ते श्री.राम नाईक यांचे ज्येष्ठ सुपुत्र जवान मुरली नाईक हे घाटकोपर कामराज नगर येथील रहिवाशी आहेत.पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना गुरुवार दि.०९ मे २०२५ रोजी पहाटे ३:०० वाजता ते शहीद झाले.भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्धवस्त केले. त्यामुळे पाकिस्तान बिथरला आहे. पाकिस्तानने भारतात हल्ले करण्यास सुरुवात केली. पाकिस्तानकडून गुरुवारी जम्मू-काश्मीरमध्ये भ्याड हल्ला करण्यात आला.या हल्ल्यात जम्मू-काश्मीरमध्ये कर्तव्यावर असलेले जवान मुरली नाईक हे शहीद झाले.देशासाठी बलिदान देणाऱ्या मुरली नाईक यांना देशभरातून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.जवान मुरली नाईक शहीद झाल्याचे वृत्त समजताच घाटकोपर परिसरात शोककाळा पसरली आहे.




**शेजाऱ्यांना मोठा धक्का देत विषय संपवला**

**वर्ल्ड बँक कोणताही हस्तक्षेप करणार नाही**

# भारत-पाकिस्तान तणावात वर्ल्ड बँकेची एन्ट्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जागतिक बँकेचे प्रमुख अजय बंगा यांनी पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. त्यांनी सिंधू जल करारावर महत्त्वाचे विधान केले आहे. वर्ल्ड बँक या प्रकरणात मध्यस्थी करणार नाही, असे बंगा यांनी स्पष्ट केले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील या करारात वर्ल्ड बँक कोणताही हस्तक्षेप करणार नाही. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात मोठे पाऊल उचलले होते. भारताने सिंधू जल करार स्थगित केला आहे. यावर अजय बंगा यांनी आपले मत व्यक्त केले.

अजय बंगा यांनी 'सीएनबीसी-टीव्ही १८'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, 'करार स्थगित करण्यात आलेला नाही. भारत सरकारने याला 'सध्यापुरती स्थगिती' असे म्हटले आहे. सिंधू जल करारात तो निलंबित करण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे हा करार एकतर रद्द करावा लागेल किंवा त्याऐवजी नवीन करार करावा लागेल. हे दोन्ही देश तयार झाले तरच शक्य आहे. वर्ल्ड बँक केवळ मदत करू शकते, परंतु कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानलाच या कराराबाबत निर्णय घ्यावा लागेल.'

अजय बंगा यांनी वर्ल्ड बँकेची भूमिका स्पष्ट केली आहे. 'दोन देशांमध्ये मतभेद झाल्यास वर्ल्ड बँक केवळ सहाय्यक म्हणून काम करेल. वर्ल्ड बँक कोणताही निर्णय घेणार नाही. मात्र, या प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी योग्य व्यक्ती किंवा संस्थेचा शोध घेण्यास मदत करेल. वर्ल्ड बँकेचे काम हे प्रशासकीय आणि आर्थिक स्वरूपाचे आहे. कराराच्या सुरुवातीला एक ट्रस्ट फंड (ढ्रीीीं र्ष्ीपव) तयार करण्यात आला होता. हा निधी मध्यस्थांच्या फीसाठी होता. वर्ल्ड बँकेची भूमिका या पलीकडे काहीही नाही, असे अजय बंगा यांनी स्पष्ट केले. याबद्दल भारत किंवा पाकिस्तानकडून कोणतीही माहिती अद्याप वर्ल्ड बँकेला मिळालेली नाही.




मीडियामध्ये येत असलेल्या बातम्यांना अजय बंगा यांनी फेटाळून लावले आहे. वर्ल्ड बँक या प्रकरणात कोणतीही भूमिका घेऊ शकत नाही, असे ते म्हणाले. हे सर्व तथ्यहीन आहे. कारण, यात आमची कोणतीही भूमिका नाही. हा करार दोन देशांमधील आहे आणि त्यांनाच ठरवायचे आहे की तो पुढे ठेवायचा की नाही. हा निर्णय त्यांचा आहे, असे अजय बंगा म्हणाले.

सिंधू जल कराराच्या ६० वर्षांच्या इतिहासात अनेक चढ-उतार आले आहेत, असे अजय बंगा यांनी सांगितले. करारात कोणताही बदल करायचा असेल किंवा तो पुढे चालू ठेवायचा असेल, तर तो निर्णय भारत आणि पाकिस्तानलाच घ्यावा लागेल, असे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. वर्ल्ड बँकेची भूमिका करारात निश्चित केली आहे, त्यापेक्षा जास्त काही नाही, असेही ते म्हणाले. याचा अर्थ वर्ल्ड बँक फक्त मदत करू शकते, पण कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे या कराराचे काय करायचे, हे भारत आणि पाकिस्तानलाच ठरवावे लागेल.

सिंधू जल करार (खथढ) भारत आणि पाकिस्तानमध्ये १९६० मध्ये झाला होता. या कराराचा उद्देश सिंधू नदीच्या पाण्याचे वाटप करणे हा होता. वर्ल्ड बँकेने हा करार घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण, आता वर्ल्ड बँकेचे म्हणणे आहे की, ते या करारात कोणताही बदल करू शकत नाही. त्यामुळे हा निर्णय भारत आणि पाकिस्तानलाच घ्यावा लागेल.

## भारत-पाक तणाव, बलुच आर्मीनं संधी साधत पाकिस्तानी सैन्याला हुसकावले, स्वातंत्र्याची केली घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : इस्लामाबादमध्ये सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धासारखी परिस्थिती आहे. पाकिस्तानला ६ मे च्या रात्रीपासून भारताच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागत आहे. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत मोठी कारवाई केली आहे. एका बाजूला भारताकडून दहशतवादी ठिकाणांवर कारवाई केल्याने पाकिस्तानी सैन्याची सळो की पळो अवस्था झाली आहे. तर दुसरीकडे बलुचिस्तानमध्ये त्यांच्यासाठी एक नवीन संकट उभे राहिले आहे. बलुच आर्मीने भारतासोबतच्या तणावाचा फायदा घेत पाकिस्तानी सुरक्षा दलांवर हल्ले वाढवले आहेत. अनेक भागांमध्ये विद्रोही गटांनी 'आजादी'चे नारे देत झेंडे फडकवले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बलुच आर्मीच्या कमीतकमी तीन गटांनी बलुचिस्तान प्रांताच्या अनेक भागांवर ताबा मिळवला आहे. सोशल मीडियावर काही फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. यात बलुच विद्रोही इमारतींवरून पाकिस्तानचे झेंडे उतरवून बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा करत आपले झेंडे फडकवत आहेत. माजी पाक पंतप्रधान शाहिद खाकान अब्बासी यांनीही कबूल केले आहे की, सरकार आणि सैन्याचे बलुचिस्तानवरील नियंत्रण सुटत आहे. बलुचिस्तानच्या समर्थकांनी जगाला मदतीसाठी आवाहन केले आहे.

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याचे समर्थक असलेल्या गटांनी पाकिस्तानी सुरक्षा दलांवर अनेक हल्ले केले (पान ३ वर...)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पंतप्रधानांचा निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सशस्त्र दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. सीमावर्ती भागातील परिस्थिती आणि शस्त्रसज्जतेचा आढावा यावर उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला असताना ही बैठक झालेली आहे. काल रात्री पाकिस्ताननं भारतीय हद्दीतील सीमावर्ती भागात हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला. रहिवासी परिसरासह सैनिकी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला करण्याचे प्रयत्न पाकिस्तानकडून करण्यात आले. भारतीय सैन्यानं सारे प्रयत्न हाणून पाडले. त्यामुळे पाकिस्तान बॅकफूटवर गेला आहे. या सगळ्या घडामोडी सुरु असताना पंतप्रधान मोदींनी सैन्याच्या तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली. सध्याची तणावपूर्ण परिस्थिती पाहता भारतानं जम्मू, श्रीनगर, लेह, अमृतसर, चंदिगढ, जोधपूरसह २८ विमानतळ बंद केले आहेत. २८ विमानतळ १५ मेच्या सकाळी ५ वाजून २९ मिनिटांपर्यंत बंद असणार आहेत. त्यामुळे एअर इंडिया, इंडिगो, स्पाईसजेटनं या शहरांमधून होणारी उड्डाणं रद्द केली आहेत. पाकिस्तानी हल्ल्यांपासून नागरिकांचं संरक्षण करण्यासाठी आणि लष्करी तयारी अधिक मजबूत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सीमा सुरक्षा दल आणि अन्य केंद्रीय दलांना हाय अलर्टवर ठेवण्यात आलेलं आहे. देशातील संवेदनशील विमानतळांची आणि त्यांच्या परिसरांची सुरक्षा वाढवण्यात आलेली आहे.

# मुल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये 'मदर्स डे' चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी 'मे मध्ये दुसरा रविवार' आणि 'मदर्स डे' या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती. १९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले. तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून 'मदर्स डे' साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. हा जगातील बराच भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस 'मदर्स डे' म्हणून साजरा केला जातो.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

भारतीय संस्कृतीत आधुनिक 'मदर्स डे' आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरी भागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे. या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस. हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्त्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये 'मातृदिन' अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे 'आई' होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते. ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.

शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला 'आई' हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत 'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' ही ओळ लिहून 'आई' या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना 'मदर्स डे' च्या शुभेच्छा!

**घर सुटतं पण आठवण कधीच सुटत नाही !**

**जीवनात आई नावाचं पान कधीच मिटत नाही !!**




# बाई तुमच्या लाडक्या विद्यार्थीनीचं पत्र

प्रिय बाई,

आपल्या आयुष्यात असंख्य हिरे येतातच पण ते हिरे आपल्या आयुष्याच सोन करतात. घडवितात तेच म्हणजे शिक्षक शिक्षिका.बाई तुम्ही शिक्षिकेच कर्तव्य पार पाडण्याआधी एका वासराच्या आई होत्या एका मुलाच्या आई होत्या. आधी आई मुलांच्या नात्यांची तटातुट झाली नंतर गुरू शिष्य नात्यांची तटातुट झाली.दिवसामागून दिवस गेले महिना गेला आणि एक वर्षे होत आल कुठे आहात? तुमचा काही फोन नाही आला. बाई तुमच्या निधनाची वर्ता ऐकून माझ्या काळाजात चर्र झाल. मी पार कोलमडून गेले.अगदी माझी गती खिळी नसलेल्या चाकासारखी झाली. कारण मी माझ्या आयुष्यात कधीही न बघितलेला असा हिरा सापडला होता. हा हिरा ज्ञानाच्या ज्योत मध्ये भेटला योगायोगाने शाळेच नाव ज्ञानज्योतच होत.प्रकाशाने जसा उजेड उजाडतो तसेच माझ्या आयुष्यात असणाऱ्या प्रकाशाचा उजेड तुम्ही होता जशी साथ बाळाला आईची लागते ती जशी प्रेम करते तशीच विद्यार्थांना साथ शिक्षक, शिक्षिकांची लागते.तु फक्त लढ हे प्रेरित हाक कानावर नाही पडली. माझ्या पाठीवर एक आधार म्हणून तुमचा हात नाही पडला तुमची बऱ्याच वर्षापासून तुमची खूप आठवण निघाली आणि सतत येत होती. कौतुकाचे दोन शब्द ऐकण्यासाठी मी खूप आसुरलेले आहे. कारण आज मी लेखनात इतिहास मांडतांना तुम्हांला माझा गर्व वाटला असता. आज तुम्ही अभिमानाने माझ कौतुक केल असत. पाठीवर शाबासकीची थाप दिली असती आणि अभिमानाने म्हटल्या असत्या दिव्यांशी बाळा अशीच प्रगती करत रहा बाळा तु नक्कीच काहीना काही करणारच.आज लेखनात इतिहास मांडते उद्या तुला इतिहास घडवायचा आहे बाळा. तु आजची धैर्यशील सावित्री, रणागणी जिजाऊ आहे बाळा आणखी खूप लढायच तुला मी कायम तुझ्या सोबत आहे माझा आशिर्वाद देखील तुझ्या सोबत आहे. बाई गुरू शिष्य नात्यांमध्ये आपल बाँडींग खूप चांगल जमत असायच. आपलच नाही तर ज्ञानज्योत विद्यालयाच्या प्रत्येक शिक्षक शिक्षिकांसोबत माझ बाँडीग खूप चांगल आहे मराठी आपल्या महाराष्ट्राची राज्यभाषा आहे मराठी शिकविणाऱ्या बाई मग याची सुरूवात कविता शुतल सुतार मॅडम पासून होते मग त्या कविता शुतल सुतार मॅडम असो आशा कदम मॅडम असो की विनोद गणेश डोंगरे सर असो दिपाली क्षिरसागर मॅडम असो विनोद सपकाळ सर असो शितल कापडणीस मॅडम असो शुभांगी मॅडम असो सोमनाथ शंकर डोंगरकर सर असो माझे आपल्या शाळेतल्या सर्व शिक्षक तसेच शिक्षिकासोबत सर्वांसोबत नात्यागोत्याचे संबंध चांगले जुळतात. फक्त नावात येणाऱ्या पहिल्या अक्षरावरून नात जुळत अस नाही. तर स्वभाव, विद्यार्थांचा मनोविकास समजून त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना घडवून एक चांगला नागरिक बनवण इतक सोपी गोष्ट नाही तर त्यांना मेहनत घ्यावी लागते. तसा विद्यार्थी चांगला कसा घडवू शकतो. म्हणून प्रत्येक गुरू शिष्यांच नात अशा पद्धतीने असण गरजेच आहे.नाहीतर हल्ली आजकाल काही शिक्षक या नात्यांचा गैरवापर करत आहे स्वतः आपल्या शिष्याला कायदा शिकवत असतांना स्वतः च कायद्याचा गैरवापर करायला निघाले.याने विद्यार्थी काय घडणार चांगला नागरिक की गुन्हेगार? असे शिक्षक विद्यार्थांना कोणत प्रशिक्षण द्यायला निघाले ?तसही यांनी गुन्हे करायच प्रशिक्षण घेतल तरी कुठून? कायद्याचा रक्षक म्हणून समाजासाठी काम करणारा नागरिक की कायद्याच पालन न करणारा गुन्हेगार घडलेला विद्यार्थी?नात्यांबरोबर ते गुरू शिष्याचा संबंध संपवतात.म्हणूनच गुरू शिष्य नात्यांना कलंक लावणाऱ्या घटना ठिकठिकाणी घडतात आणि घडल्या आहेत. गुरू शिष्याला गुरूदक्षिणा द्यावी लागते आणि ति गुरू दक्षिणा शिष्याला पार पाडावी लागते.कधी कधी शिक्षकांना विद्यार्थ्यांचा मित्र बनाव लागत. म्हणून आपल नात आणि तसच आहे बाई, खर सांगू मी अगदी इतिहासाच्या प्रेमात पडले.मला इतिहास इतका आवडू लागला की याची कशी व्याख्या मांडू हे शब्दांत सांगता येणार नाही. बाई इतक्या वर्षांत आपण फक्त शरीराने दुर होतो पण मनाने एकत्र होतो. बाई आज मला आपल्या शाळेतल्या शिक्षकांची, शिक्षिकांची मनापासून माफी मागायची आहे. बाई मला ज्या विषयात रस नव्हता त्याच विषयामध्ये मी माझ ध्येय नाही घडवू शकले. पण त्याच महत्त्व मला आता कळायला लागलय.मराठी विषय आला की कविता शुतल सुतार मॅडम आठवतात.ज्या मराठी भाषेने बालभारती मराठी मायबोलीने मला मराठी बोलून वक्तृत्व मध्ये ओढल आणि लेखनाकडे ढकलल ग्रंथावर प्रेम करायला सांगितल. म्हणूनच कविता सुतार मॅडमने शिकवलेला माझा ग्रंथप्रेम धडा आजही तोंडीपाठ आहेआणि ग्रंथप्रेम हा बाबासाहेब आंबेडकरचा धडा होता बाबासाहेब देखील ग्रंथावर प्रेम करायचे बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिला ग्रंथ म्हणजे आपले भारतीय संविधान याचा फार आदर वाटतो कारण त्यांनी मला कायद्याच्या चौकटीत उभ केल. आणि बालभारती पुस्तकातले धडे नाही तर काही पुस्तक माझ्या तोंडपाठ आहे मग ते कोल्हाट्याच पोर असो, मुलांची टेन्शन आणि पालक राजेश कोळंबकरच असो की अभ्यास असा करावा प्रा. मा. म देशमुख यांच असो अगदी मी काही पुस्तक वाचून वाचून पाठ करून टाकली मराठी ही आपली मातृभाषा मराठी मध्ये कधीही मी अक्षर न गिरवणारी मुलगी होते. आज मला त्यांनी मला मराठी विषयांची गोडी लावली आहे.मराठीमध्ये अक्षर गिरवून आहे वृत्तपत्रात लेखनी देखील मराठी भाषेत चालवत आहे. म्हणूनच मला साहित्यकार,कवी क्षेत्रात जाता येत आहे.गणित म्हटलं तर विनोद डोंगरे सर आठवतात पण गणितामधून मला कृष्ण चाणक्य नाही बनता आल, गुरूद्रोणाचार्य नाही बनता आल.पण त्या गणितामधून मला व्यवहाराचा हिशोब आणि वेळेच गणित टप्पयांची पायरी कळली. ते आज कामी आलय मला विज्ञान म्हटलं की शितल कापडणीस मॅडम आठवतात मला आजच्या विज्ञानातला प्रयोग प्रत्यक्षात कळतोय मला वैज्ञानिक नाही बनता आल मला डॉक्टर नाही बनता आल. बाई काही पालक स्वतः च्या मुलांची आणि इतर मुलांची तुलना करतात ही तुलना केली की मला इतका प्रचंड राग येतो चिड येते कारण मला सांगा हाताची पाच बोट खरच सारखी आहे का?आपल मुल इतर मुलांसारख कस काय असू शकत?. मग मला वाटत पाल्यांना एखाद्या चांगल्या मनोउपचार तज्ज्ञांकडे उपचार करायला नेल्यापेक्षा पालकांनी स्वतः चा उपचार मनोउपचार तज्ज्ञांकडे करावा. मी ह्या पालक आणि मुलांच्या भावना मांडून पालकांना मी सुजान पालकत्व घडण्याचा नक्की प्रयत्न करेल. पण जीवंतपणी रक्तदान करा आणि मेल्यावर नेत्रदान करा हे आज वैज्ञानिक मध्ये सांगितलं आहे. हे मला करता येईल इतकीच शाश्वती आहे. मला इंग्रजी म्हटल तर आमच्या वर्गशिक्षिका आशा कदम आठवतात मला इंग्रजी मध्ये मोठ्या -मोठ्या पदव्या नाही घेता आल्या पदव्या घेऊन मला वकील नाही बनता आल. मी समाजात वकीलची भाषा करत आहे कारण चुकीच्या लोकांच्या डोक्यात चांगल्या गोष्टीचा प्रकाश पडत नसेल तर मला माझी वकीलची भाषा बोलावी लागते. इंग्रजीतल ज्ञान कळलय महत्त्व कळलय. मला शिस्तबद्ध नियम आठवला की दिपाली क्षिरसागर मॅडम आठवतात खूप कडक त्या आतून कडक वरून गोड. त्या असायच्या कडक भरायची माझ्या हृदयात धडक आणि तितक्याच प्रेमळ आहे.दिपाली मॅडम जेव्हा ओरडायच्या तेव्हा मला फक्त कटकट वाटायची तेव्हा मला शिस्त म्हणजे काय ? हे कळत नव्हतं पण आज मला हीच कटकट आयुष्याची कटकट शिकवते. शिस्तप्रिय राहायला शिकवते.त्या सांगतात लोकांना शिस्त कळत नसेल ना तर थोडस माणसाने कठोर बनाव.म्हणूनच मी शिस्तीत घडले.मला हिंदी आठवल की विनोद सपकाळ सर आठवतात.१४ सप्टेंबर हिंदी दिवस असतो मला कळलय. राष्ट्रभाषा आहे हे कळलय.मला क्रिडा म्हटलं की सोमनाथ डोंगरकर सर आठवतात खेळामुळे वाढणारी स्मरणशक्ती आणि होणार व्यायाम यामुळे निरोगी शरीर बळकट बनतय हे कळलय.पण मला उत्कृष्ट खेळाडू म्हणून गिता फोगाट नाही बनता आल.क्रिकेटर महिला नाही बनता आल. मला पर्यावरण म्हटलं की शुभांगी मॅडम आठवतात पर्यावरण मुळे मला स्वच्छतेचा संदेश कळला योगायोगाने मीच शालेय जीवनात आरोग्यमंत्री होते आणि मला स्वच्छतेचा संदेश द्यायला संत गाडगेबाबांनी शिकवल तेच काम मी करत होते आणि करत राहणार मुख्यध्यापिका मनिषा किशोर कोरडे मॅडम नवीन शिक्षक म्हणून रुजू झालेले सचिन पाटील सर, सुनिता पाटील मॅडम जयश्री मोरे मॅडम, ज्या बालवर्गाला शिकवत असणाऱ्या शुभदा शिंदे मॅडम सगळेच माझे आदरणीय शिक्षक /शिक्षिका आहे.बाई आपल्या शाळेतल्या सर्वच शिक्षक सहकार्यांनी प्रत्येक विषयांच्या धड्याबरोबर मला आयुष्याचे धडे दिले. त्यांची मी आभारी आहे. बाई तुम्ही क्रांतीच्या इतिहासाच्या अभ्यासाबरोबर कायद्याचा अभ्यास शिकवला कारण इतिहास आणि राज्यशास्त्र हा एक विषय म्हणजे जोडलेला दुवा होता. बाई तुम्ही सांगितल होत स्वतः ला इतिहास घडवायचा असेल तर आधी विद्रोही व्हाव लागत चुकीच्या गोष्टीला विरोध दर्शवावा लागतो आणि तोच विद्रोह आतापर्यंत मी दर्शवत आली आहे. आणि म्हणूनच मी विद्रोही लेखनी तालावरच्या धारेने चालवत आहे. सत्याला वाचा फोडत आहे कारण माणसाने नेहमी सत्याच्या वाटेने जाव.आणि कायदा शिकवत असतांना तुम्ही सांगितल होत की जर तुम्हांला कायद्याचा रक्षक बनायच असेल तर कुठलाही भेदभाव न करता तुम्ही प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष रक्षक बना . बाई म्हणून मी सम्यक विद्यार्थी आंदोलनचा महासचिव कार्यकर्ते होते. तो लढा सत्यासाठी, न्यायासाठी आहे.इथल्या वंचितासाठी आहे.बाई इथून पुढे देशाचा जबाबदार नागरिक म्हणून मी कायद्याचा रक्षक बनेल .हे बघायला तुम्ही आज असायला हव्या होत्या.तुम्हांला हे सगळ बघून खूप अभिमान वाटला असता.बाई, तुमच्यासारखा हिरा मला परत मिळेल का? किंवा तो हिरा माझ्या आयुष्यात येईल का? जर मला तुमच्यासारखा हिरा सापडला नाही तर आकाशपातळ एक करून शोधून काढेल. आणि हिरा जर माझ्या आयुष्यात आला तर मी त्या हिऱ्याला म्हणेल' माझ्या आयुष्यात पहिला हिरा असाच आला होता पण तो आज नाहीसा झाला त्याच्या रूपात तु आला तर माझ्या आयुष्याच सोन करायला मला फार अभिमान वाटला. माझ्या आयुष्याच सोन करशीलच पण आयुष्याच्या संकटावर लढण्यासाठी मार्गदर्शन कर आणि बळ दे. बाई कायद्याचा रक्षक जरी बनले तरी इतिहास घडवायचा हे विसरणार नाही. मी इतिहास नक्कीच घडवेल. बाई नियतीने आपल्या शाळेतल्या शिक्षक शिक्षिकांची भेट घडवून आणली त्यात तुम्ही नव्हता. तुमचा डाटा, कायम साठवला आहे. तुमच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त तुम्हांला भावपूर्ण श्रद्धांजली वाहते. हे पत्र तुमच्यापर्यंत पोहोचेल का नाही माहिती नाही बाई? ज्ञानज्योत पर्यंत नक्की पोहोचल आहे. पण या पत्रातून माझी श्रद्धांजली ठरेल. तुमच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**तुमची लाडकी विद्यार्थीनी**
**दिव्यांशी दिपक साळवे**
**ज्ञानज्योत विद्यालय खारघर**
**इयत्ता ५ वी (विद्यार्थीनी)**
**फोन ९६६५१२५४५८**

**परराष्ट्र मंत्रालयाकडून अधिकृतपणे पत्रकार परिषद घेत दिली माहिती**

**कर्नल कुरैशींनी सगळं सांगितलं**

# पाकचा पंचनामा! काल रात्री काय घडलं? ३६ ठिकाणं अन् ४०० ड्रोन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तानने ८ आणि ९ च्या रात्री ड्रोनच्या माध्यमातून हल्ला करण्याच्या जो प्रयत्न केला तो भारताने हाणून पाडला. पाकिस्तानच्या कालच्या कुरापतीनंतर वेगवेगळ्या बातम्या समोर येत होत्या. पण अधिकृत अशी कोणतीच माहिती समोर येत नव्हती. अखेर परराष्ट्र मंत्रालयाकडून आज अधिकृतपणे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी सविस्तर माहिती देण्यात आली. परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरैशी, विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी अधिकृतपणे पत्रकार परिषद घेत घटनेची सविस्तर माहिती दिली. यावेळी मोठा खुलासा करण्यात आला. पाकिस्तानकडून तब्बल ४०० ड्रोन्सनी भारताच्या सीमाभागात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे बहुतेक ड्रोन हल्ले भारतीय लष्कराने हाणून पाडले, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.



८ आणि ९ मे च्या मध्यरात्री पाकिस्तानी सैन्याने भारतीय लष्करी तळांवर निशाणा साधण्यासाठी भारताच्या पश्चिम सीमेवर प्रवेश करण्याचा अनेकदा प्रयत्न केला. एवढंच नाही तर नियंत्रण रेषेवर मोठ्या शस्त्रांचा वापर करुन गोळीबार देखील केला. आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर लेह पासून तब्बल ३६ ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातून घुसखोरीचा प्रयत्न करण्यात आला. भारतीय सुरक्षा यंत्रणांनी त्यातील अनेक ड्रोन्सला खाली पाडलं, असं कर्नल सोफिया कुरैशी यांनी सांगितलं.

एवढ्या मोठ्या प्रमाणातील हवाई घुसखोरांचा संभाव्य उद्देश हा वायुरक्षा प्रणालीचं परिक्षण करणं आणि देशाची संवदेनशील आणि गुप्त माहिती गोळा करण्याचा प्रयत्न होता. ड्रोनच्या मलब्याची फॉरेन्सिक तपास केला जातोय. प्राथमिक तपासात समोर आलं आहे की, संबंधित ड्रोन हे तुर्की बनावटीचे आहेत. या व्यतिरिक्त पाकिस्तानच्या सशक्त युएईने पाकिस्तानच्या एअर बेसवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याला पकडण्यात आलं आणि निष्क्रिय करण्यात आलं. पाकिस्तानच्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानात चार हवाई रक्षा ठिकाणी सशक्त ड्रोन लाँच करण्यात आले. यापैकी एक एडी रडारला नष्ट करण्यात यशस्वी ठरला, अशी माहिती कर्नल सोफिया कुरैशी यांनी दिली.

पाकिस्तानने जम्मू-काश्मिरच्या तंगधारा, उरी, पुँछ, राजौर, अखनूर आणि उधमपुर येथे भारी कॅलिबर आर्टिलरी गन आणि सशक्त ड्रोनच्या उपयोग करुन नियंत्रण रेषेच्या पार गोळीबारदेखील केला. त्यामुळे भारतीय सैन्याचे काही जवान जखमी झाले. भारताने देखील प्रत्युत्तर पाकिस्तानच्या सैन्यांना देखील नुकसान पोहोचवण्यात आलं, असं कर्नल सोफिया कुरैशी यांनी सांगितलं.

क्रूर पाकिस्तानने हल्ल्यानंतर हवाई क्षेत्र बंद न करता वेगळी चाल आखली

पाकिस्तान गैरजबाबदार व्यवहार पुन्हा समोर आला. ७ मे ला पाकिस्तानने रात्री साडेआठ वाजता एक अयशस्वी ड्रोन आणि मिसाईल हल्ला केल्यानंतर पाकिस्तानने आपलं हवाई क्षेत्र बंद केलं नाही. पाकिस्तानने आपल्या नागरी विमानांना ढाल बनून उपयोग करत आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानला माहित आहे की, भारतात हल्ला किल्ल्यानंतर भारताकडून तीव्र प्रतिक्रिया दिली जाऊ शकते. हे भारत आणि पाकिस्तान दरम्यान आंतरराष्ट्रीय सीमेवर नागरी विमानांनी उड्डाण करणं सुरक्षित नाहीय. कराची आणि लाहोरच्या दरम्यान नागरी वाहतूक सुरु आहे. भारतीय वायुसेने आपली प्रतिक्रिया देताना संयम दाखवला आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीचं संरक्षण केलं, अशी महत्त्वाची माहिती कर्नल सोफिया कुरैशी यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पादचारी वृद्धाला दुचाकीने ठोकरले

सोलापूर : सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या कारखान्याकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर फिरण्यासाठी गेलेल्या वृद्धाला सोमवारी (दि.५) दुचाकी धडक दिली. याप्रकरणी बसवराज अरुण स्वामी (वय ४८ रा. स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अरबाज शेख (रा. कुमठे गाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे जेवण करून विमानतळ येथील रोडवर फिरण्यासाठी गेले होते. फिरून घरी येताना रस्ता ओलांडताना साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयित आरोपी अरबाज शेख यांच्या ताब्यातील दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी बी ७८३६) ही अति वेगाने हयगयीने अविचाराने चालवून जोराची धडक दिली. यात वृद्ध गंभीर जखमी झाला आहे असे फिर्यादीत नमूद आहे.

### माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

सोलापूर : अक्कलकोट रोड येथील कल्पना नगर येथे टेलरचे दुकान घालण्यासाठी आई-वडिलांकडून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्याची घटना २५ जून २०२३ ते आजपर्यंत फिर्यादीच्या सासरी घडली. याप्रकरणी मुस्कान नाजीम पटेल (वय २४, रा. कोंडा नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती नाजीम, सासू महाबुबी शरीफ पटेल, नणंद अंजुम मा. हुसेन उस्दत (सर्व रा. कोंडा नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी लग्नानंतर काही दिवस चांगले नांदवले. नंतर पती नाजीम याला टेलरचे दुकान घालण्यासाठी आई-वडिलांकडून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत संशयित आरोपींनी फिर्यादीस वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करून शारीरिक मानसिक त्रास दिला. तसेच फिर्यादीचे स्त्रीधन देखील तिला परत दिले नाही असे फिर्यादीत नमूद आहे.

### पैशाच्या वादातून मित्राने केली मित्रास मारहाण

सोलापूर : समाधान नगर येथे पैशाच्या वादातून मित्राने मित्रालाच गुरुवारी (दि.८) मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी सचिन चिद्रामप्पा पाटील (वय ४१, रा. नाईकवाडी नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादीवरून आप्पा मदकुणकी (रा. समाधान नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी व संशयित आरोपी हे दोघे गुरुवारी रात्री साडेदहा वाजता दारू पिऊन घरी जात होते. यावेळी पैशाच्या कारणावरून फिर्यादीचा मित्र संशयित आरोपी आप्पा मदकुणकी याने दारूच्या नशेत करून तू माझे घेतलेले दोन हजार रुपये परत कधी देणार या कारणावरून शिवीगाळ करीत मारहाण केली. रस्त्यावर पडलेला दगड उचलून फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# तुळजापूर ड्रग्ज प्रकरणी पोलिसांचा तपास योग्य दिशेने कुणालाही सोडणार नाही

## तपास अधिकारी गोकुळ ठाकूर; ३६ आरोपींपैकी १५ जणांना केली अटक, २१ जण अद्याप फरार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या राज्यभर गाजत असलेल्या ड्रग्ज प्रकरणी १५ आरोपींना अटक केली असून २१ जण फरार आहेत त्यांचा शोध चालू आहे पोलिसांचा तपास योग्य दिशेने चालू आहे जो दोषी आढळेल आढळल्यास सोडले जाणार नाही मग तू कोणी असो त्या सोडले जाणार नाही असे पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी सांगितले.

तुळजापूर डग्स प्रकार राज्यासह देशात ही गाजत आहे तस्करीत एकूण ३६ आरोपी आहेत पंधरा जणांना पोलिसांनी अटक केली असून अजून २१ आरोपी फरार आहे याप्रकरणी १००४४ दोषापत्र दाखल केले आहे आरोपींनी संगत मताने ड्रग्ज विक्री व ड्रग्ज साठवणूक ड्रज विक्रीतून बेकायदेशीर आर्थिक फायदा अवैद्य संपत्ती कमावणे ड्रग्ज सेवन करणे असा ठपका ठेवून कारवाई करण्यात आली आहे या सह फरार आरोपींची चौकशी चालवावी त्यांच्या नातेवाईकांना बोलवून त्यांची सखोल चौकशी चालू केली आहे त्यांचे नातेवाईक जिल्ह्यात राज्यात कुठे आहेत याची चौकशी चालू आहे.

फरारी आरोपींच्या नातेवाईकांकडून तसेच मित्राकडून घेतला जात आहे तसेच पुणे येथील फरार आरोपी अटक करण्याच्या अनुषंगाने आरोपींचे नातेवाईक मित्र अशा सर्वांची चौकशी करण्यासाठी त्यांना तामलवाडी पोलीस ठाण्यात बोलावून घेऊन सखोल चौकशी करण्यात येत असून पुण्यालाही व्हीआयपी ट्रीटमेंट देण्याचा प्रश्नच येत नाही असे पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी बोलताना सांगितले तसे तुळजापूर ड्गप्रकरणी पोलिसांचा तपास योग्य दिशेने असून लवकरच फरार आरोपींच्या मुस्क्या आवडल्या जाणार आहेत तसेच या दग्जप्रकरणी कुणालाही सोडले जाणार नाही मग तो कोणीही असो अशी तपास अधिकारी तथा तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी बोलताना सांगितले आहे तसेच हा तपास पोलीस अधीक्षक संजय जाधव अप्पर पोलीस अधीक्षक चकाकत आम्हाला मॅडम तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक गोहार आसन उपविभागी पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश देशमुख व जिल्हा सरकारी वकील महेंद्र देशमुख यांच्यामार्फत केला जात आहे.

# नागरसोगा गावचे वेदिका मिश्रा, वेदांत मिश्रा बहिण भावांनी घेतले बारावीला ६६.६७% गुण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : औसा तालुक्यातील नागरसोगा येथील वेदिका सचिन मिश्रा व वेदांत सचिन मिश्रा दोन्ही भावंडांनी जवळगा पोमादेवी येथील विद्यानिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतुन बारावीची परीक्षा दीली होती. काल बारावीच्या निकालात वाणिज्य शाखेतुन नागरसोगा येथील वेदिका मिश्रा व वेदांत मिश्रा या विद्यार्थ्यांनी बारावि‍ला दोघांनीही एकसारखे समसमान ६६.६७ % गुण घेत आगळा वेगळा विक्रम केल्याने विद्यानिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमीक विद्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी वेदांत व वेदिका दोन्ही बहिन भावांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन वेदांत व वेदिका च्या घरी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी वेदांत व वेदिका मीश्रा यांचे औक्षण करुन पेडे भरवत जल्लोश करण्यात आला. यावेळी प्रकाश मिश्रा, श्रीकांत मिश्रा, शशिकांत मिश्रा, सोनाली मिश्रा. सचिन मिश्रा, केशव सुर्यवंशी, राधा सुर्यवंशी, सुषमा पांडे,हिरकना सुर्यवंशी, द्रोपती सुर्यवंशी, राम सुर्यवंशी, संदिप मिश्रा महेश मिश्रा, ज्योती मिश्रा, मंजु मिश्रा, विशाखा मिश्रा, संदिप मिश्रा, शुभांगी लोहारे, माजी सैनिक राम सुर्यवंशी, गायत्री शिंदे, गौरी तिवारी, आंबिका पांडे सह विद्यानिकेतन विद्यालयाचे सर्व शिक्षक व नागरसोगा गावातील ग्रामस्थांना शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# शैक्षणिक कारणासाठी लागणारे दाखले काढून घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : इयत्ता १० वी व १२ वीच्या निकालानंतर पुढील प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थी व पालकांची विविध दाखले काढण्यासाठी सर्व आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात गर्दी होते. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे शैक्षणिक कारणासाठी लागणारे विविध दाखले त्वरीत काढून घेण्याचे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

**अतिरिक्त पैसे आकारल्यास करा तक्रार**



विद्यार्थी व पालकांनी पुढील प्रवेशाकरीता गरजेचे शैक्षणिक दाखले मिळण्यासाठी जवळच्या सेतु केंद्रात, आपले सरकार केंद्र येथे अर्ज करावेत. तसेच ठराविक दरापेक्षा अतिरिक्त दर आकारल्यास आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर (ठठ) कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत, संबंधिताना क्यु आर कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येईल असेही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले आहे. तसेच तहसिल कार्यालय पंढरपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान ग्रामस्तरावर राबविण्यात येणार आहे.

# मेट्रो तीनच्या अंतिम मार्गाचे ऑगस्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे मेट्रो ३ मार्गिकेवरील टप्पा २ अ बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकादरम्यानच्या (९.७७ किमी) सेवेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. मेट्रो तीनच्या आचार्य अत्रे चौक ते कुलाबा या मार्गावरील अंतिम टप्प्याचा शुभारंभ येत्या ऑगस्ट महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.

मुंबई मेट्रो लाईन-३ (फेज २अ - बीकेसी ते आचार्य अत्रे चौक) सेवेचा विस्तार शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीकेसी स्थानकातून हिरवी झेंडी दाखवून केला. त्यानंतर मान्यवरांनी बीकेसी ते सिद्धीविनायक मेट्रो स्थानकादरम्यान प्रवास करत मेट्रोचा आनंद लुटला. यावेळी जपानचे महावाणिज्यदूत यागी कोजी सान, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.

मेट्रोच्या शुभारंभानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे मेट्रो ३ च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या १३ कि.मी. मार्गाचे लोकार्पण ७ ऑक्टोबर २०२४ रोजी झाले. आता फेज २अ - बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्ग हा दुसरा टप्पा उद्यापासून नागरिकांसाठी खुला होणार आहे. आतापर्यंत २२ कि.मी. मेट्रो सुरू झाली आहे. मेट्रोचे काम वेगाने पूर्ण करण्यात येत असून मेट्रो तीनचे काम अंतिम टप्प्यात पोचले आहे. येत्या ऑगस्टमध्ये मेट्रो ३ च्या अंतिम टप्प्याचा मार्गावरील मेट्रो सेवा सुरू होईल. मेट्रो ३ मुंबईतील विमानतळांशीदेखील जोडली जाणार आहे.



**मेट्रोचे काम हे अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार**

मेट्रोचे काम हे अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. बीकेसी ते आचार्य अत्रे चौक हा मेट्रोचा मार्ग मिठी नदीच्या खालून जात आहे. त्याचप्रमाणे गिरगाव सारख्या गर्दीच्या ठिकाणीही मेट्रोचे काम सुरळीत झाले आहे. आता अंतिम टप्प्यातील दोन स्थानकांची कामे वेगाने सुरू आहेत. आतापर्यंतच्या मेट्रोला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. अंतिम टप्पा सुरू झाल्यानंतर कुलाबा-वांद्रे-सीप्झ-आरे या मार्गावर प्रवाशांना उत्तम कनेक्टिविटी मिळेल. या मार्गावरील सर्व मेट्रो स्थानकेही अत्याधुनिक सुविधांनीयुक्त असून प्रत्येक स्थानकावर प्रवेशासाठी अनेक प्रवेश मार्ग असल्याने गर्दीचे योग्य व्यवस्थापन होईल. तसेच मेट्रो मार्ग हे प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुंबई महानगर प्रदेशात मेट्रोची कामे मोठ्या वेगाने सुरू आहेत. याद्वारे मुंबईकर तसेच महामुंबईतील नागरिकांसाठी सुलभ व अखंड परिवहन जोडणी (सिमलेस ट्रान्स्पोर्ट सिस्टीम) यंत्रणा तयार करण्याचे काम सुरू आहे. यावर्षी ५० कि.मी. तर पुढील वर्षी आणखी ५० कि.मी. मेट्रोचे काम पूर्ण करण्याचा मानस आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**सिंगल प्लॅटफॉर्मवर सर्व सार्वजनिक परिवहन सेवा मिळणार**

मेट्रो, बेस्ट, लोकल या सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी सिंगल प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यातून प्रवाशांना एकाच तिकीटावर प्रवास करण्याची सुविधा मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात मुंबईत हा प्रयोग सुरू करण्यात येणार असून त्यानंतर महामुंबईतही ही सेवा देण्यात येणार आहे. सध्या यावर प्रायोगिक तत्वावर काम सुरू असून लवकरच त्याचा व्यावसायिक वापर सुरू होईल. यामुळे नागरिकांना मुंबई तसेच महामुंबई परिसरात सुलभपणे प्रवास करता येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

बेस्टने कालच गुगल सेवेबरोबर सांमजस्य करार केला आहे. यापुढे बेस्टच्या बसेसचे रिअल टाईम लोकेशन गुगलवर मिळणार असून या ठिकाणी प्रवाशांना आपल्या प्रवासाचे नियोजनही करता येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**मेट्रो प्रकल्पामुळे मुंबईकरांना दिलासा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मुंबईकरांसाठी आजचा दिवस आनंदाचा आहे. मेट्रोमुळे मुंबईतील लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मेट्रोमुळे या मार्गावरील सुमारे चार ते पाच लाख वाहने कमी होणार आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर इंधन व वेळेची बचत होणार आहे. देशातील सर्वात मोठे मेट्रोचे जाळे मुंबईत उभारण्यात येत आहे. नागरिकांची गरज ओळखून कामे होत आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. मेट्रोची कामे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावरील ५० टक्के वाहने कमी होतील. त्यामुळे महामुंबईकरांसाठी मेट्रो प्रकल्प वरदान ठरणार आहे.

टप्पा २ अ - बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्गाची माहिती :

- स्थानकांची संख्या - ६ (सर्व भूमिगत)
- अंतर - ९.७७ किमी
- हेडवे - ६ मि २० सेकंद
- तिकिटाचे दर
- किमान भाडे रु. १०/-, कमाल भाडे रु. ४०/-
- गाड्यांची संख्या - ८
- प्रवास वेळ (बीकेसी ते आचार्य अत्रे चौक)- १५ मिनिटे २० से - फेऱ्यांची संख्या - २४४ फेऱ्या
- प्रवास वेळ आरे जेव्हीएलआर ते आचार्य अत्रे चौक- ३६ मी
- तिकिट दर आरे जेव्हीएलआर ते आचार्य अत्रे चौक किमान भाडे रु. १०/-, कमाल भाडे रु. ६०/-
- एकूण एस्केलेटरची (सरकते जीने) संख्या (आरे जेव्हीएलआर ते आचार्य अत्रे चौक) २०८
- एकूण उद्वाहक (लिफ्ट) संख्या (आरे जेव्हीएलआर ते आचार्य अत्रे चौक) - ६७

**कनेक्टिविटी**

बीकेसी, वरळी यांसारख्या बिझनेस हब्सना जोडले जाणार आहे. बीकेसी स्थानक मेट्रो मार्ग २ बी आणि बुलेट ट्रेनशी भविष्यात जोडले जाणार असून त्यामुळे प्रवासी संख्येत वाढ होणार आहे. सिद्धिविनायक मंदिर, माहीम दर्गा आणि माहीम चर्च यासारखी धार्मिक स्थळे तसेच शिवाजी पार्क, रवींद्र नाट्य मंदिर, शिवाजी मंदिर, यशवंत नाट्य मंदिर, प्लाझा सिनेमा यासारखी मनोरंजनाची ठिकाणे देखील या मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहेत.

## अ.भा. भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# व्हीआयपी दर्शनाचे पैसे खाजगी कर्मचाऱ्याच्या खात्यात!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर येथेतखझ व पेड दर्शन ५०० पैसे मंदिराच्या खात्यावर न पडता खाजगी कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा होत असलेल्या बाबत या मागणीसाठी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री जिल्हाधिकारी धर्मादाय आयुक्त तहसीलदार तथा व्यवस्थापक मंदिर संस्थान तुळजापूर यांना दिनांक आठ मे रोजी सदर निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे सदर निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर येथे महाराष्ट्र तसेच देशातून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात त्या यापैकी बरेच भाविक हे वेळेच्या अभावामुळे व्हीआयपी तसेच पेड पास काढून लवकर दर्शन घेत असतात शासनाने डिजिटल पेमेंट मोड चा वापर करा असे वारंवार सांगत असते त्यामुळे



भावी सदर पास काढत असताना पाचशे पैसे हे ऑनलाईन पद्धतीने भरत असताना परंतु मंदिर कर्मचारी रोग पैसे देण्यास सांगत असतात तसेच मंदिराच्या खात्याच्या किंवा आर कोड द्वारे पैसे मंदिर खात्यात जमा न होणे अपेक्षित असते.

परंतु मंदिरामध्ये लावलेले मंदिराच्या खात्याचे अनेक क्यूआर कोड हे चालत नाहीत तेव्हा कर्मचारी हे स्वतःच्या मोबाईलवरील किंवा आर कोड द्वारे स्वतःच्या खात्यामध्ये पैसे भरण्यास भाविकांना सांगतात व आम्ही हे पैसे मंदिर खात्यावर जमा करतो असे सांगतात परंतु खरोखरच हे पैसे मंदिराला मिळतात काय त्यावरही अशा पद्धतीने दरोडा पडतो हे मोठे प्रश्नचिन्ह आहे तेव्हा मा महोदयांनी मागील सहा महिन्यापासूनची वरील गोष्टीची सखोल चौकशी करावी व दोषी व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच येथून व्हीआयपी व पेड पाचशे भावी सोडले जातात तेथील सीसीटीव्ही तसेच व्हीआयपी रजिस्टरच्या नोंदी जुळतात का याची वरिष्ठ अधिकाऱ्याकडून आमच्या समक्ष तपासणी करण्यात यावी तसेच विहार व पास करा काढणारी कर्मचारी यांचे बँक स्टेटमेंट चेक करण्यात यावे व गेटवरून व्हीआयपी सोडणारी कर्मचारी यांचे सीडीआर इत्यादी सर्व गोष्टींची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात यावी व त्यात काही अधिकारी व कर्मचारी दोषा आढळतात त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी असेही निवेदनात नमूद करण्यात आले या निवेदनाने जिल्हाधिकारी गणेश पाटील यांची स्वाक्षरी आहे.

# भारत-पाक तणाव, बलुच आर्मीनं संधी साधत पाकिस्तानी सैन्याला हुसकावले, स्वातंत्र्याची केली घोषणा

(पान १ वरून..) आहेत. क्वेटा शहरातच पाकिस्तानी सुरक्षा दलांना कमीतकमी चार मोठे हल्ले परतवून लावावे लागले आहेत. बलुचिस्तानचे लेखक मीर यार बलुच यांनी सोशल मीडियावर लिहिले आहे की, बलुचांनी आपले झेंडे फडकवण्यास सुरुवात केली आहे आणि पाकिस्तानी झेंडे उतरवले जात आहेत. त्यांनी जगाला पाकिस्तानमधील दूतावास बंद करून बलुचिस्तानमध्ये उघडण्याची विनंती केली आहे. मीर म्हणाले की, लवकरच पाकिस्तानच्या विभागणीची घोषणा होऊ शकते, कारण आम्ही आमच्या स्वातंत्र्याचा दावा केला आहे.

गुरुवारी बलुच लिबरेशन आर्मीच्या लढवय्यांनी केच जिल्ह्यातील दश्तुकमध्ये पाकिस्तानी सैन्याच्या बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाला खएऊ ने लक्ष्य केले. केचच्या कटगनमध्ये पाकिस्तानी सैन्याच्या चौकीवर स्वयंचलित शस्त्रांनी हल्ला केला. जमुरानच्या साह डेम परिसरातही असेच खएऊ स्फोट झाले. या हल्ल्यांमध्ये अनेक सुरक्षा दलाचे जवान मारले गेल्याचा दावा केला जात आहे. पाकिस्तानच्या महत्त्वाच्या ठिकाणांना, जसे की गॅस पाइपलाइनला देखील लक्ष्य करण्यात आले. आर्मीने डेरा बुगतीमध्ये पाकिस्तानच्या गॅस क्षेत्रांवर हल्ला केला. या भागात पाकिस्तान पेट्रोलियम लिमिटेडचे १०० पेक्षा जास्त गॅस विहिरी आहेत.

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये विरोध होणे ही काही नवीन गोष्ट नाही. पण सध्याची परिस्थिती सेना प्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज यांच्यासाठी मोठी डोकेदुखी ठरू शकते. एकीकडे भारतासोबत सुरू असलेल्या तणावामुळे त्रस्त असलेल्या पाकिस्तानी सैन्याला बलुचिस्तानमधील बंडखोरीशी सामना करणे सोपे नाही. तज्ज्ञांचे मत आहे की, हे पाकिस्तानच्या अस्तित्वासाठी धोकादायक ठरू शकते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा



## मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा बैठकीत दिले दिशानिर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे

- प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.

- राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

- ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

- ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागृती करा.

- केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

- प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

- प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.

- एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

- पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

- सैन्याच्या तयारी संबधित चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

- सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या

- नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

- शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या

- सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

# भविष्यात एसटीच्या नव्या बसेस हायब्रिड इंधनावर : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ दरवर्षी पाच हजार याप्रमाणे पुढील पाच वर्षांमध्ये २५ हजार बसेस घेण्यात येणार आहेत. सन २०२५-२६ पासून उर्वरित २० हजार बसेस या पर्यावरणपूरक अशा सीएनजी व एलएनजीसारख्या इंधनाबरोबर डिझेल इंधन हायब्रिड करून चालणाऱ्या असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाईल, जेणेकरून बस प्रवाशांची गैरसोय होणार नाही, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते पर्यावरणपूरक इंधनाच्या संदर्भात बोलावलेल्या एसटी अधिकारी व संबंधित इंधन पुरवठादार संस्थांच्या बैठकीमध्ये बोलत होते.

मंत्री श्री.सरनाईक म्हणाले, एसटीकडे बहुतेक सर्व बसेस डिझेल इंधनावर चालणाऱ्या आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चा पैकी सुमारे ३४ टक्के खर्च हा इंधनावर होतो. दररोज सुमारे १० लाख ७० हजार लिटर इतके डिझेल लागते. वर्षाला सुमारे ३४ हजार कोटी रुपये इंधनावर खर्च होतो. भविष्यात डिझेल इंधनाची उपलब्धता व वारंवार होणारा दरातील बदल लक्षात घेता, पर्यायी इंधन वापरणे आवश्यक आहे. सीएनजी आणि एलएनजी हे पर्यायी इंधन प्रकार तुलनेने डिझेलपेक्षा स्वस्त असून पर्यावरणपूरक देखील आहेत. तसेच या इंधनाची कार्यक्षमता चांगली असल्याने बस प्रति लिटर ५-५.५ किलोमीटर अंतर कापते. डिझेल इंधनावर मात्र बस प्रति लिटर केवळ ४ किलोमीटर अंतर कापते. सहाजिकच एलएनजी व सी एन.जी. इंधन वापरल्यास इंधनावरील खर्चात बचत होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. पुढील वर्षीपासून घेण्यात येणाऱ्या नव्या २० हजार बसेस हायब्रीड इंधनावर चालणाऱ्या घेण्यात येणार आहेत.



एलएनजी इंधनावर २० टक्के सूट

एसटी महामंडळाने यापूर्वी किंग्ज गॅस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी सोबत केलेल्या करारानुसार एलएनजीइंधन हे तत्कालीन डिझेल इंधनाच्या किमतीच्या २० सूट कमी दराने पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्याच्या खर्चात दरवर्षी २३५ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

राज्याभरात ९० ठिकाणी एलएनजी चे पंप उभारले जाणार आहेत. तसेच महानगर गॅस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे सीएनजी चे २० पंप उभारले जात आहेत. त्यामुळे भविष्यात इंधन पुरवठ्याची व्यवस्था होणार आहे. या दोन्ही इंधना सोबत डिझेल इंधनावर चालेल अशी हायब्रीड बसेस तयार करण्याचे प्रस्ताव बस मॅन्युफॅक्चर कंपन्याकडून मागविण्यात आले आहेत. भविष्यात एसटीच्या तफ्यात या दोन इंधनावर चालणाऱ्या हायब्रीड बसेस घेण्याचा एसटीचा मानस असल्याचे मंत्री श्री.सरनाईक यांनी सांगितले.

# राज्यातील मत्स्य व्यवसाय क्षेत्राला कृषी दर्जा देण्यासंदर्भातील शासन निर्णय जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील मच्छिमार व मत्स्यसंवर्धक यांना कृषी क्षेत्राप्रमाणे विविध पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यासाठी मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्यासंदर्भातील शासन निर्णय राज्य सरकारने जारी केला आहे. मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्याने आणि पुढाकाराने मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा शासन निर्णय तातडीने जारी करण्यात आला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील मच्छिमार व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य असून राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न पशुपालन, मत्स्यपालन, फळे, भाजीपाला या क्षेत्रांवर देखील मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. राज्यातील मत्स्य व्यवसायिकांचे हे योगदान लक्षात घेऊन मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीत मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्यात आला होता. याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या शासन निर्णयामुळे राज्यातील मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्य उत्पादक, मत्स्य व्यवस्थापन, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्य बोटुकली संवर्धन करणारे घटक तसेच यामध्ये प्रतवारी, आवेष्टन, साठवणूक करणारे घटक अशा व्यक्तींना कृषी क्षेत्राप्रमाणे पायाभूत सोयीसुविधा व सवलती उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होणार आहे तसेच स्थानिक पातळीवर मत्स्य व्यवसायाद्वारे रोजगारनिर्मितीत मोठा हातभार लागणार आहे. त्याकरिताच राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या कृषी क्षेत्राला मिळणाऱ्या विविध सुविधा आणि सवलती या आता मत्स्य व्यवसाय क्षेत्रालाही या शासन निर्णयामुळे मिळणार आहेत.

**सवलतीच्या दरात वीज पुरवठा, किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दरात कर्ज मिळणार**

या निर्णयामुळे मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प यांना कृषी दराने सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड याचा लाभ दिला जाणार आहे. बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रानुसार अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभही मत्स्य क्षेत्रात देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सौर ऊर्जा संदर्भात देण्यात येणारे लाभ यापुढे मत्स्य व्यवसायिकांना देण्यासही राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

या शासन निर्णयात मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य व्यवसायिक , मत्स्यकास्तकार, मत्स्यबीज, मत्स्य बोटुकली संवर्धक, मत्स्य व्यवस्थापन अशा मत्स्य व्यवसायाशी संबंधित संज्ञांच्या प्रथमच सुस्पष्ट व्याख्या निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील मत्स्य उत्पादक त्याचबरोबर मत्स्य व्यावसायिक आणि त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या कामगार क्षेत्राला या शासन निर्णयाचा मोठा लाभ मिळणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील हा नवा भारत आहे, पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले जाईल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड (जिमाका) : -पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम भारत करत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेला हा घुसके मारेंगे वाला भारत आहे.

आमच्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम या दहशतवाद्यांनी केलं त्यासाठी ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले त्याचे मी स्वागत करतो. पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम आमचे जवान करत आहेत या दरम्यान महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाले त्यांना मी आदरांजली वाहतो असे म्हणत, केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे महाराष्ट्रात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी बैठक झाल्याचीदेखील एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



बीडच्या तारकेश्वर गड येथे संत नारायण बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस, यांची प्रमुख उपस्थिती होती.. गडाच्या विकासासाठी आवश्यक ती मदत आपण करणार असल्याचा शब्द देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज यांना दिला.

कार्यक्रमासाठी गडावरील हेलिपॅड वर त्यांचे आगमन झाले त्यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

**मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली पणन संचालक मंडळाची पुण्यात बैठक**

**विविध विषयावर मंडळाच्या बैठकीत चर्चा**

# शेतमाल विक्री व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करा : पणन मंत्री जयकुमार रावल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्रीची व्यवस्था अधिक सक्षम करणे हे पणन मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यात उत्पादन होणारे फळे व भाजीपाला यांचे ग्रेडिंग, पॅकिंग आणि मार्केटिंगसाठी जागतिक मार्केट व्यवस्थेशी सुसंगत उपाय करणे आवश्यक आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या शेतमालाचे मार्केटिंग वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला वर्तमान व्यवस्थेशी सांगड घालून वेगाने काम करावे लागेल. राज्यातील वर्तमान शेतमाल विक्री व्यवस्था व्यवस्थित असली तरी जगाच्या कृषी माल विक्री व्यवस्थेशी स्पर्धा करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील शेतमाल कृषी व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियोजन करावे,असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न मंडळाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन संचालक मंडळाची आज मंडळाचे मुख्य कार्यालय गुलटेकडी येथे बैठक झाली. या बैठकीत मंडळाच्या विविध विषयांचा आढावा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी घेतला. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, सहकार आयुक्त दिपक तावरे, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संचालक विकास रसाळ, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, व्यवस्थापक शैलेश जाधव तसेच पणन मंडळाचे सदस्य नारायण पाटील, संचालक संजय पाटील,मंडळातील संचालक व अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. रावल म्हणाले, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी पणन मंडळ कार्यरत असून त्यांच्या हिताच्या सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने योजना तयार करा. त्यादृष्टीने व्यवस्था उभी करण्याचे काम पणन मंडळाचे आहे.शेतकरी उपयोगी सुविधा केंद्र असावीत अशा प्रकारे सुविधा केंद्रांचे अद्ययावतीकरण करा. शेतकऱ्यांच्या मालाला मूल्य वर्धन करण्याची उपाय - योजना, नियोजन पणन मंडळाने करावे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळावा अशी शासनाची भूमिका आहे. योजना किंवा सुविधांसाठी नागरिकांना ताटकळत ठेवण्याची मानसिकता बदलून अधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.



ते म्हणाले, बाजार समित्या मजबूत, सक्षम व आधुनिक सुविधांनी युक्त व्हाव्यात यासाठी पणन मंडळाने प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांना राज्यातील कोणत्याही बाजार समितीतील खरेदी-विक्रीचे दर कुठल्याही बाजार समितीत उपलब्ध होतील अशी यंत्रणा इ - नामच्या माध्यमातून राबवण्यात येत आहेत. ती प्रक्रिया आधिक गतिमान व पारदर्शक करावी. केवळ औपचारिक प्रक्रिया न राबवता, बाजार समित्यांचे आर्थिक स्वास्थ्य चांगले राहील याची खबरदारी घेऊन विकास कामांना गती द्यावी. बाजार समित्यांमधील विकास कामे करतांना स्टार्टअपला संधी द्यावी. ही कामे करतांना दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. सर्व बाजार समित्यांनी संचालक मंडळाच्या बैठकीत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. प्रस्तावातील मागणीच्या खर्चाचा रेशो ठरवून २५ टक्के स्वनिधी खर्च झाल्याशिवाय उर्वरित कर्ज रक्कम मंजूर करण्यात येऊ नये. उर्वरित ७५ टक्के निधीतील किमान ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणाऱ्या सुविधा निर्माण कामांसाठी वापरावी. रस्ते दुरुस्तीसाठी बाजार समित्यांनी स्वनिधी वापरावा, थकीत कर्ज वसुलीप्रकरणी विभागीय कार्यालयांनी बाजार समित्यांना भेटी द्याव्यात. ज्या बाजार समित्यांवर प्रशासक नेमलेले असतील तेथील १०० टक्के वसुली करावी, असे सांगून ठाणे जिल्ह्यातील बापगाव येथील पणन मंडळाच्या जागेवर तातडीने संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरु करावे, तसेच मंडळाने राज्यातील शेतमालाची व शेतमाल बाजार भावाची माहिती देणारे स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून द्यावे असे निर्देशही त्यांनी दिले.

तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला देण्यात येणाऱ्या निधीत वाढ, ई-नाम योजना अंमलबजावणी, उपविभागीय कार्यालये स्थापित करण्याबाबत, वाशी येथील सुविधा केंद्र, संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी, काजू फळपिक योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात ५ हजार मे. टन क्षमतेचे गोदाम उभारणीबाबत, सल्लागार नियुक्त करणे, वाई तालुक्यातील उपबाजार समिती पाचवड येथे सेल हॉल बांधणी प्रस्ताव, अहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समिती आवारा अंतर्गत व उपबाजार समिती नेप्ती येथील रस्ते दुरुस्ती, अंशदान व कर्ज वसुलीचा आढावा घेऊन विविध विकास कामांसाठी कर्ज मागणी प्रस्तावांवर विचारविनिमय करण्यात आला. तसेच मंडळाच्या थकीत कर्जाबाबत वन टाइम सेटलमेंट योजनेच्या संदर्भातही विचारविनिमय करून नवीन धोरण ठरवण्यात येत असे त्यांनी सांगितले.